
# कालस्वर

शंकर वि. वैद्य



३११५१

प्रा. रवीन्द्र किम्बहुने ह्यांच्या वैयक्तिक
ग्रंथसंग्रहातून देणगी स्वरूपात

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा.

नवे कवी

नवी कविता ४

---

१

**ग्रेस**

संध्याकाळच्या कविता

२

**ना. धों. महानोर**

रानातल्या कविता

३

**अनुराधा पोतदार**

आवर्त

४

**शंकर वि. वैद्य**

कालस्वर

५

**वसंत सावंत**

स्वस्तिक

प्रा. रवीन्द्र किन्वहुने यांच्या वैयक्तिक
ग्रंथसंग्रहातून देणगी स्वरुपात

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा

# कालस्वर

## शंकर वि. वैद्य

सार्वजनिक वाचनालय कल्याण
पुस्तकाचे नाव ____
क्रमांक ____ वर्ग ____
१०२२०५ काव्य ४५१ (रा.)

पुस्तकाची पाने फाडू/दुमडू नयेत.

पुस्तक जपून वापरावे

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

© १९७१ शंकर वि. वैद्य
आफ्रिका हाउस, एडनवाला रोड, माटुंगा, मुंबई १९

पहिली आवृत्ती : १९७१ / शके १८९२

मुखपृष्ठ : पद्मा सहस्रबुद्धे

मुद्रक : वि. पु. भागवत, मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, गिरगाव, मुंबई ४

प्रकाशक : ग. रा. भटकळ, पॉप्युलर प्रकाशन, ३५ सी ताडदेव रोड, मुंबई ३४

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा.

## अनुक्रमणिका

धागा ९
अभिषेक १०
तू : वेळा : ११
तोल १२
बादली १३
श्रावणसरी १४
एक भयाचे नगर १५
काही सुचत असते... १७
कुहू...कुहू १८
खिडकी १९
एक खाष्ट म्हातारा २१
ती न्हाते! २२
भय २४
एक अनुभव...स्वप्नातला! २५
हात हालतोच आहे तर... २७
पदर जळाला... २८
विस्तवापरीस होतो धूमसून २९
नावाडी ३०
ऊन! ३१
तुझे प्रेम पाहूनिया ३३
अशी ३४
तुझ्या प्रीतीने कळले ३५
धागा ३६
आज डोळां पाणी ३७
पान ३८
आज माझे कोण? ४०
कळून न कळता – ४१
थेंब! ४२
काजवा ४३
कणी–कोंडा ४४
यायची तू ४५
वास फुलाचा घेताना ४६

एक स्वप्न ४७
अर्थ ४८
परीटदादा ४९
रूळ ५२
व्यथा ५४
पापणिच्या काठावर ५५
ताण ५६
आज हवेला ५७
तिळा उघड! ५८
नाव न घेताच ६०
दोन! ६१
कसे क्षणी भरे मन! ६२
बेताल मी! बेबंद मी! ६३
रंग ६५
मन ६५
भेटलीस तू ६५
ओंजळ ६६
श्रावणसंध्या ६६
मी पाहिलेली कळी ६६
हायड्रोजन बॉंब ६७
पक्षी ६९
स्पंदन ७०
आधार! ७१
कितीक वर्षे... ७३
वाट पाहता पाहता– ७५
डाव ७७
बोहारीण ७८
निदान ७९
कवितेसाठी ८०
कधी उमलले क्षण हे ८१
तेव्हा ८२

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा.

१०२२०५
काव्य ४५१२

# कालस्वर

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा.

धागा ——

विश्वी पावलोपावली
बीजे जन्मांची सांडली
पाय पाय टाकताना
त्यांची फुले उमलली

फुलाफुलांचा प्रवाह
न्हाते तेच एक मन
तुझा रंग माझा गंध
एका फुली ये फुलून

जाती गुंफली त्या मनी
विस्कळली सारी फुले
झाला ओवून हा जन्म
तरी धागा पुढे चाले

जन्म वेचीत गुंफीत
आलो आदि बिंदूतुन
तुला जन्मांची त्या शपथा
संगतीस माझे मन !

[illegible]

## अभिषेक

या देवघरास केळीचे खांब लावून
होताच तू आसनस्थ
तुझा सोनकलश घेऊन पूजेसाठी
तुझ्या सर्वस्वास लागलेली आच
होते गोळा तुझ्या डोळ्यांत ओथंबलेल्या

रसरसत्या कांतीतून उजळतात नीरांजने
तरारतात केसर फुलातले सोत्कंठ
धूपातून दरवळते सुगंधी श्वसन
किणकिणत्या लहरींचा अंगांगी कल्लोळ

तुझ्या रतिसांद्र डोळ्यांतला
हा अभिषेक भोगताना
माझेच सर्वस्व होते अनावर
निर्झरत्या सुखधारा

अभिषिक्त तू
अभिषिक्त मी....

....दिशाकार डोळ्यांत भरलेला आनंद
आनंदकलश ओसंडणारा!

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा.

## तू : वेळा :

तू : वेळा : भूतकाळची, निसटुनिया गेलेली
छायामय झालेली
शांत जळातुन दिसे द्वारका
जळामधी बुडलेली
तू : वेळा : अशी आजची, घनतेतुन भरलेली
अंगांगी भिडलेली
अर्ध झाकली, निरभ्र अर्धी
स्वादास्वादातुन कळणारी, उलगडणारी
क्षणाक्षणांच्या गंध-ऋळांतुन फुलफुलणारी
दोन दिशांच्या आरससरसी
बिंबुन अनंतलेली
तू : वेळा : दूर उभीशी मुग्ध मानिनी
धुक्याआड दडलेली
झुळझुळणाऱ्या विरल अंबरी लपेटलेली
उरात ठेउन अद्‌भुत काही अबोलणारी
गूढ कामिनी !
उसळे रक्तामधले मीपण हात लांबवुन
विवस्त्र करण्या निऱ्यांस झटुनी घेता ओढुन
निरीनिरी उकलते क्षणांची
आणि तरीही तुला पुरवितो
वस्त्रे कुणितरि गूढ क्षणांची........
तू : वेळा—

# तोल

मूर्ति तुझी ही

गालांच्या उंचवट्यांतून निघून
हनुवटीवरल्या अणुमात्र बिंदूत
सकोन येऊन टेकणारे दोन सुरेख किरण

दोन्ही स्कंधबिंदूंतून निघून
केवल नाभिमूलात मिळणारे दोन सुरेख किरण
आणि दोन्ही कटिबंधांतून तिरकस सूर घेऊन
जुळवलेल्या चरणमध्यात एकाग्र मिळणारे
दोन सुरेख किरण

एका स्पर्शमात्र बिंदूवर टेकून
त्रिकोणावरती त्रिकोण उभे
तीन
निर्विकार आकारलेले, भरीव सोज्वल

एका अवघड पूर्णविरामावर सर्वस्वाचा तोल

ज्याच्यातच
उदयास्ताचे नाते एकाच रेषेत गोठवून
तू पेलले आहेस
तुझ्या ध्यानलयी डोळ्यांतल्या प्रकाशबिंदूंवर,
त्यांच्याखाली निग्रही मन ठेऊन
एकाग्र.

प्रा. रवीन्द्र किम्बहुने ह्यांच्या वैयक्तिक
ग्रंथसंग्रहातून देणगी स्वरुपात

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा.

## बादली

कधी बुडाली बादली कोणास ठाऊक काठोकाठ भरले हिनकळते पाणी
ओढता ओढता वाटले आली पुरती भरून मधीच ठेचकाळून सांडून गेले पाणी
किती मास आले किती ऋतू गेले ओढणे असे कधी थांबलेले नाही
पडलेल्या छिद्रांतून आले पाणी तसे गेले गळून तृष्णा शमलेली नाही
रहाट ओढता ओढता गुरफटले आयुष्य इथे काचलेले तिथे उकललेले
शेवटी काय भरून येणार आहे वरती 'काय'वरती अजून लक्ष खिळलेले !
किती किती बिंबे डोळ्यांत उमटलेली पाण्याबरोबर सारी गळून गेली.... गेली
अर्थ शोधता शोधता अर्थ उरी धरता प्रश्नांची छिद्रे बुडी उरलेली
किती युगे गेली ? मांडलेल्या संख्येवर अवकाशाचे शून्य उरलेले वरती
रहाटावर गुंडाळल्या काळाबरोबर पिढ्या आल्या किती किती गेल्या किती किती
माझे माझे म्हणून उरी कवटाळलेले पळीभर पाणी हाती ठेऊन गेले
ओल्या ओल्या डोळ्यांत उजाड वाळवंट उजाड वाळवंट शेवटी उरलेले
निदान माझा मला शेवटचा आधार येथेही अंदाज पुरता हुकलेला
गतीच्या विळख्यात विळख्यात गुरफटताना माझ्या हातामधून मीही निसटलेला
शेवटच्या क्षणाला आता दिसते पृथ्वी विराट रहाटाच्यासारखी फिरणारी
पर्वतांच्या खुंट्या धरून ओढता ओढता स्वप्नांमागून स्वप्ने मावळली सारी
कधी बुडाली बादली कोणास ठाऊक कशासाठी भरले हिनकळते पाणी
—तुटलेला पोहोरा कसा येणार वरती ? गर्भातही वेदना झोंबलेल्या मनी !

## श्रावणसरी

मेघ सावळा फुलारूनिया विरघळला अंबरी
कलत्या रविचे ऊन विंचरित आल्या श्रावणसरी
तुषार चुंबुन किरण कोवळे कलती पूर्वेकडे
वसुंधरेला इंद्रधनूचे स्वप्न गुलाबी पडे

खुळा होउनी मेघ डवरुनी नाचे मोरापरी
गिरक्या घेउन मंद उतरती या सोनेरी सरी
सरीस फुटते हास्य उन्हाचे ऊन पाझरे उरी
अनुरक्तीची मिठी रेशमी कायापालट करी

नभी अजुनही मेघ उपणितो तुषार मोत्यांपरी
अजुन लावतो रवि क्षितिजांना सोनेरी झालरी
निळ्या घनातुन घननीळाचे भास किती पांगले
पूर्वेवरती म्हणुन सुदर्शन अजुनी खोळंबले

विस्मित होउन हासुन बघते ही ओलेती धरा
भिजून सुकते सुकून भिजते सुकते भिजते जरा
सघन सुखाची ओढ अनावर दाटे तिचिया उरी
ऊन-सरींतुन घार भरारे दिगंत मेघोदरी !

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा.

# एक भयाचे नगर

एक भयाचे नगर
भोवती अद्भुत डोंगर : घळीत अदृश्य अजगर
रोमांचांच्या राई सताड उभ्या उतरणीवर
शहाऱ्यांचे लोंगर
डोंगरावरून टांग टाकून येतो अदृश्य पहारेकरी
पावलांचे ठसे दिसतात वळणावरल्या धुळीवर
त्याचे डोळे रेडियमचे चमचमते सरोवर
नजरेची सुई अखंड फिरते अवकाशाच्या डायलवर
मध्यरात्रीस 'होश्यार' बांग उमटते वाऱ्यावर
त्याच्या पावलाशी धडधडते एक भयाचे नगर !

एक भयाचे नगर
सावल्या सावल्या सावल्या सावल्या
भुयारातून जाणाऱ्या चोरवाटा चपापलेल्या
बावरलेले डोळे कोठलाही रंग धारण करणारे
शब्दांवर जगणारी मने अनिश्चयाने कुजबुजणारी
मनांतल्या मनांत गुप्त गणिते करणारी
धास्तीने लगेच पुसणारी
मखमलीवरून चालावे तशी अलगद मुकी गती
जमिनीवर

रात्री अनाद धडधडणारी सशाची काळिजे
मिणमिणणाऱ्या दिव्यांची स्तब्ध वसाहत :
क्षीण सोबत !
आयुष्यातले सारे क्षण हलके फोल

पत्त्यांतल्या बंगल्यासारखे सावध रचलेले
जळपृष्ठावर चळचळणाऱ्या तारांसारखे
साऱ्यांचे आत्मे हलत राहिलेले
एक भयाचे नगर — झोपेतही जागत पाहिलेले !

९०२२०५
काव्य ४५१२

## काही सुचत असते...

—काही सुचत असते
तुला थांबवीत मी काही म्हणतो :
'हे बघ थांब, माझ्या मनात काही घडते आहे....थांब, थांब!'
तुझे हात-वारे चालू राहतात, मानेला लचका देत
....वारे वाहतात
फक्त-आकाशात विजा लकाकतात
आकाशाचा एक आरसा होतो, पुन्हा पुन्हा
खळकन् बिलोरी भिंगे फुटून कोसळतात
एका गावावर....!

सारे शांत होते....आभाळ आभाळ होते
तजेल्यात गाव प्रसन्न होते
'मी काय म्हणते ते तुझ्या गावीही नाही!'
—आणि त्या गावावर विमानांचा तांडा येतो
किंचाळत
बॉम्बचा वर्षाव....जमीनदोस्त घरकुले....
उध्वस्त उजाड संध्याकाळ, विमाने जाताना
आणि तेवढ्यात एक अजाण इंद्रधनुष्य
उमटत असते क्षितिजावर
'मला काहीच किंमत नाही तुझ्या आयुष्यात!
काय पाहातोस वेंधळ्यासारखा?'
—विमानांचा तांडा इंद्रधनुष्यामधून गेलेला....

## कुहू....कुहू

कुहू....कुहूचा संतत ताल
दोन कुहूंच्या मधुनी काल
संथपणे ये होउन लाट
आर्त मनाचा भिजवित काठ
खोल अनावर लावी ओढ
काळाची चव गोडच गोड

## खिडकी

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा.

त्या उंच इमारतीवरली ती तुझी खिडकी
वाटते तू तेथे येशील....दिसशील

पहाटेचे धुके तुझ्या खिडकीभोवतीच घोटाळते
उन्हाची दृष्टी तिष्ठते कवडसे होऊन
चंद्राचे कबूतर घुमत राहाते वळचणीत;
अंधाराच्या डोहातून—
पूर्वेचे तांबडे फुटते अनिवार पोटतिडिकेने
वाटते तू येशील....दिसशील

मी बघत असतो एकाग्र

बघता बघता माझे डोळे खिडकी होतात
पहाटेचे धुके तिच्या काचांवरच ओलावते
चंद्र उगवतो खिडकीभर घासत बुबुळांवर
साचून अडतो अंधार पापण्याभरून, क्षितिजेभरून
तडकणाऱ्या काचेवरल्या रेघेसारखी
सकाळची पूर्व या डोळ्यांतच उकलते

मी बघत असतो एकाग्र

आणि कधी तू खिडकीत येतेस माझ्या-माझ्यासाठी
पहाटेचे लडिवाळ धुके भोवती-भोवती करते माझ्या
उन्हे उडवतात केशराची बोटे माझ्या खिडकीवर
चंद्र उगवतो सायंकाळी जुळवीत दुवे अंगभर
साचलेल्या अंधाराला गोड कळा कमल-जन्माच्या
पहाटेच्या

तू नसतेस....

मी बघत असतो एकाग्र, विस्कटतानाही
अवकाश उरतो एक घारा डोळा आक्षितिज
भावली नसलेला!
आणि अस्तित्वास जाणवत राहातो
धरण फुटलेल्या कालाचा रंग-रुचिहीन प्रवाह
झोंबणारा
जन्माचा थर थर धुवून नेणारा....

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा.

## एक खाष्ट म्हातारा

एक खाष्ट म्हातारा काळोखासारखा भरून माळ्यावर आपला असतो पडलेला
कोळ्यांच्या जाळ्यांमधून सुरकुतलेला त्याचा चेहरा मधीकधी अस्पष्ट दिसलेला
भिंतीच्या गालांना ओल खाऊन खाऊन सूज येऊन वरती बुरशी वाढलेली
झरोक्याच्या किलकिल्या डोळ्यांवरती काळ्या तुळईची भुवई मोडून ओढलेली
पणजोबांचे घड्याळ आ करून पडलेले पणतीचा सारा खेळ त्यात आवरलेला
धुळकटलेली पंचांगे आजोबांनी ज्यांवर मोडी लिपीत जन्मांचा हिशेब मांडलेला
पोथ्यांमधून वाळवी : मातीच्या शिरांतून धुकट पेशी खातात अक्षर नि अक्षर
पडलेला पाळणा—कुबटलेल्या गाद्यांचा लोंबलेला कापूस लंगड्या बाजेवर
थकलेली आजी कधी माडीवर जाऊन कालवलेल्या भांड्यांची चिवडाचिवड करते
ऐंशी वर्षे बघत आलेल्या डोळ्यांना अंधारातून अशा कसे काय दिसते?
मधीकधी पाळण्यात मांजरी येऊन विते, बोका खातो पिल्लांस स्वतः जन्म दिल्या
अंधारास हात करून व्याकुळ आजी म्हणते, 'अरे हत् मेल्या! अरे हत् मेल्या!!'

## ती न्हाते !

ती न्हाते, ती न्हाते
रूप तिचे आरसाच
जल वरुनी ओघळते
चंचल जललहरींवर
चांदणेच चमचमते — ती न्हाते

जल घ्याया ती लवता
देह बघे लवथवता
बघत बघत लाजुनिया
पदर जलाचा घेते — ती न्हाते

ऊर डवरला झुलता
हनु टेकुन मधि बघते
काहितरी आठवुनी
गोड शहारुन फुलते — ती न्हाते

करि घे जल त्यात बघे
नयनमीन जलि हलते
पापणिच्या पक्ष्यांची
झेप तयांवर पडते — ती न्हाते

घन कुंतल ओलेते
वाफ कुरळ घे मुरके
कांतीची गंधवती
वीज मधुन ओघळते — ती न्हाते

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा.

आर्द्र पहाटेपरि ती
वसन लपेटुन येते
घेई मम कानोसा
एवढेच मज पुरते....! ती न्हाते !

## भय

शुक्र : रात्र : अमावास्या :
टवकारणाऱ्या तारा :
तम डोहाळला : सोडी
मनी शहाऱ्यांचा झरा :

कडा अंधार : भेदून
आल्या प्रकाशाच्या मुळ्या
त्याच्या पारंब्या धरून
उतरल्या मूर्ति काळ्या

माझ्या देहा लटकले
माझ्या छायेचे वाघूळ
देह जरा हालता ते
करी गूढ चुळबुळ

जरा वाजता पाचोळा
धस्स : ऊर उसवले
लक्ष शहाऱ्यांचे थवे
रक्त भेदून उडाले !

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा.

## एक अनुभव...स्वप्नातला

वेळ—अर्धजागृत पहाटेच्या वर्णासारखी
उंच घाट....खोल दरी....किर्र झाडी ओलावलेली
कड्याजवळ घर
आभाळ—मिटून पापण्या उघडणारे हळूच. तंद्रीत.
दरीत उतरणारी पाऊलवाट
बघतानाही सावरावा लागतो तोल....
....खोल

उगवलेला नक्षत्रांकित आभाळमध्यावर
एक लालसगौर अर्धा हात....ठळक
विशाल, सुकुमार,
लखलखत्या बांगड्या रत्नजडित
दाटलेले मनगट प्रकाश-पुलकांनी
हाताचा आविर्भाव नृत्यातला
प्रसन्नतादर्शक,—बोटे फणीदार
तर्जनी अंगठ्याशी मिळवून गोल,
धरलेल्या फांद्यांवर पांढरी शुभ्र फुले,
त्यांतच एक बेहोष लाल फूल
अर्ध-उमलत्या कमलासारखे
उजवीकडे मान करून झुकलेले, डौलदार
लांबसडक देठ उतरलेला तळहातावर—

'अहाहा ऽ '.......'एक नवे नक्षत्र !'....
'....ओळखीचा हात'....

हातापलीकडचे सारे—
        झाकलेले धुक्यात आभाळात
        उमटत होते हळूहळू
        दिव्यांनी लखलखणाऱ्या नगरीप्रमाणे
—लावण्यसुंदर

................

मंद चांदण्यांचे घनदाट रान दूर डोंगरपायथ्यास
किरमिजी हरण
रानावरून तडक उडी घेताना दिसणारे
अधांतरी

पाझरणारे धुके
पाऱ्याच्या वाहिन्या स्रवू लागलेल्या
पूर्व दिशेस........अंगभर !

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा.

१०२२०५
काळ ४५१२

## हात हालतोच आहे तर...

साऱ्या दिशांच्या पोलादी पाकळ्या
मिटत आल्या आणि
केंद्रवर्ती आवळत चालल्या
त्या गाभ्यातच माझे मन

अजून माझे मन

लाटांवर लाट भरती वाढत चाललेली
या सागरतळाशी मी
गुडुप अंधारात
पाण्याचा क्रूर पर्वत माझ्यावर लोळणारा

अजून मन जागे आहे
आहे माझे मन

हात हालतोच आहे तर लिहून ठेवावे
बोटाने या अंधारपाण्यावर
....मन !

५

## पदर जळाला....

प्रकाश – किरणांनी विणलेला
आकाशाचा पदर जळाला
दहा दिशांना पडली वेजे
सूर्य रक्तबंबाळ जाहला

विझले रेशिम अजून हलते
धूर ओलसर दबत पसरला
तेजाखाली काजळिचे खच
खिन्नपणाने उबवित बसला

चळते पृथ्वी पायाखाली
चेतनेतुनी शरीर गळते
डोळ्यांमागुन कुणी सुयांनी
जरा बाहुल्या मोठ्या करते

जळत्या पदरी दग्ध वासना
मुरगळलेली; राख जाहली
नख सत्त्वाच्या गळा लागले
होळी झाली! होळी झाली!

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा.

## विस्तवापरीस होतो धुमसून

विस्तवापरीस होतो धुमसून
राख पांघरून आपुलीच
कशास आनंदे झालीस जळण
चकोराचे मन घेऊनिया
वासनेच्या देही अंगाराचे मन
इथे विकसन ज्वाळारूपे
स्पर्शता तू सारे बंधन सुटले
जाळीत निघाले ब्रह्मास्त्र हे
कसा तुला जपू मला मी सांभाळू ?
आता जळू-जाळू एकठाय !
ज्वाळांवर ज्वाळा डोंब उसळला
दोघांच्या वाट्याला सतीपण ! !

## नावाडी

इकडे श्यामल दबुन टेकडी
पूर्वांगाला घुमट पलिकडे
मधून थोडी अलगद उतरण
जरा मधोमध वाट तुरुतुरू
उतरत चढती पुन्हा उतरती
येत नेमकी दक्षिणेकडे
तिथेच खाडी
मऊ भुईच्या दुबेळक्यामधि
सर्वस्वाने लाट घे उडी
....लाघट होडी ! झुकती....कलती
अन् नावाडी
बांबू रोवुन खडा तीवरी
शिडासारखा फुरफुरणारा;
उत्कंठेने वाट पाहतो,
फेसाळत येत्या लाटेची !

प्रा. रवीन्द्र किम्बहुने ह्यांच्या वैयक्तिक
ग्रंथसंग्रहातून देणगी स्वरुपात

## ऊन !

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा.

ऊन किती भोळसर
कळ्यांवर उतरले
कळ्या हासता, मोहून—
तेच फुले-फुले झाले !

ऊन बावळे-भाबडे
जली खेळायाला गेले
आणि जलाच्यापरी ते
लाजू-मुरकू लागले !

ऊन किती धांदरट
गजांवर आदळले
होता ठिकऱ्या ठिकऱ्या
आता वेचीत बसले !

ऊन वेंधळे ! तिरप्या—
कौलांवर लवंडते
लोळताना पडे, तरी
रोज तिथेच पेंगते !

घेई ज्योतिष्याचे सोंग
मुठी वेलींच्या उघडी
हात त्यांनीच दाबता
याची वळली बोबडी !

ऊन बिचारे सरळ
धडा काही न शिकले

आता म्हाताऱ्या भिंतीचे
प्राय चुरीत बसले !

घरी दौलत असूनी
ऊन भणंग भिकारी
घरी छायेचे अस्वल
आणि....फिरे दारोदारी !

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा.

## तुझे प्रेम पाहूनिया

तुझे प्रेम पाहूनिया मनी कालवते खोल
मुक्या ओढीने वठल्या वृक्षी का बसे कोकीळ ?
कोठकोठले हे नाते किती जन्म मागे जावे ?
धागे कुठून जोडीत असे येथवरी यावे ?
तुझ्या लोचनांशी कधी काही अनंत थांबते
म्हणे, 'ओळख !' परंतु जाता ओळखू लपते !
तुझी ओढ पाहताना जन्म सांधू लागताती
खुणा काही सापडता-सापडता हरवती
मनी कालवते खोल परी पुरे न कळते
फक्त प्रकाश-रेषेची चीर अंधारा पडते !

## अशी

अशी बघसी की सारी
डोळ्यांमध्ये गोळा होशी
राई स्वप्नांची झुकून
उभी गूढ डोहापाशी

अशी बोलसी की प्राण
सूर बनून उमटे
गत आयुष्यांचा पूर
उभ्या जन्मावरी लोटे

कशी हासतेस : जशा—
मनी तिष्ठलेल्या लाटा
मुक्त होऊन बेहोष
येती बिलगाया काठा

मीलनात : नवी नवी
क्षणोक्षणी कणोकणी
वारा झेलते शरीर
खोल तुडुंबले पाणी

किती बघू ? किती घेऊ
सारी घेऊन उपाशी
सारे देऊन कशी तू
नव्यानव्याने भरशी ?

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा.

## तुझ्या प्रीतीने कळले

तुझ्या प्रीतीने कळले :
राधा कशी जन्मा आली
गीता सांगणारी शक्ती
सूर मुरलीचे झाली —

बीज अंकुरते कसे
नाजुकल्या वेदनांनी
मुळे पृथ्वीच्या धमन्या
होता वृक्ष ये फुलोनी —

लागे मातीच्या ईर्ष्येला
नव्या जन्माचा डोहाळा
तिचा जीव वृक्षातून
रंगगंधांत व्यक्तला.

साद देता तू कवच
प्राणावरचे फुटले
विश्वाची तू फांदी ! वरी —
माझे नभ फुलविले !

## धागा

विश्वी पावलोपावली
बीजे जन्मांची सांडली
पाय पाय टाकताना
त्यांची फुले उमलली

फुलाफुलांचा प्रवाह
न्हाते तेच एक मन
तुझा रंग माझा गंध
एका फुली ये फुलून

जाती गुंफली त्या मनी
विस्कळली सारी फुले
झाला ओवून हा जन्म
तरी धागा पुढे चाले

जन्म वेचीत गुंफीत
आलो आदि बिंदूतून
तुला जन्मांची त्या शय्या
संगतीस माझे मन !

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा.

## आज डोळां पाणी

आज डोळां पाणी      आले गे साजणी
मुळे ही तोडोनी      घेता घेता
तुझ्यापाशी येता      हात थबकला
मला माझ्या कळा      पुऱ्या ठाव्या
स्वतः पेरलेला      जीव तोडवेना
त्यावीण निघेना      पाय परी
तूच गोंजारिले      मस्तक प्रेमाने
हलक्या हाताने      मुक्त केले
कोठल्या सामर्थ्ये      कळ तू सोसली
नेत्री न सावली      पडू देता
मायेची शिदोरी      दिलीस वरती
जीव तळहाती      घेवोनिया
माघारी सारून      प्रेयसीला काय
तुझ्यातली माय      पुढे झाली ?

## पान

जन्मलो आपण भिन्न भिन्न काळी
कसर राहिली मुळातच
आगेमागे केव्हातरी तुटायाचे
मरण उद्याचे आज ठाके
पेरताना बीज मनही पेरले
जीवाने वाढले दोघे एका
कशी तोडायची नाजूक मुळे ही
लागता बोटही कासाविशी

बारावर काटा पडे त्याचा टोल
निसटे आभाळ उरातुनी
नको होता क्षण दिसे दौड त्याची
नजर वैऱ्याची दुरूनिया
एका क्षणापोटी देठ उगवला
वाढता जुळला सुटा काळ
तोच क्षण आज दैव मागो आले
प्राणाशी पोचले हात त्याचे

आवंढ्याच्या आड जीव हा अडला
करून मोकळा किती दावू?
शब्दाच्या, गळ्याच्या शिरा दाटलेल्या
पोटीचा उमाळा पोटी उरे
दाटले उरी ते शब्दावीण पंगू
मात्र ऊर लंघू जाता द्रवे
उरल्या शब्दांच्या लक्तरांमधून
ओल घे जाणून अंतरीची—

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा.

दूर सार पृथ्वी सूर्य ग्रह तारे
नेत्रां दिसणारे सारे सारे
तळहाताचे या उरो फक्त पान
त्यात माझे मन स्पंदणारे
हातावरी ये त्या सानुली बनून
शरीर घेऊन इवलेसे
म्हणीन ना तुला तेव्हा फक्त 'बाळ'?
....अर्थाचे आभाळ त्यातले घे

## आज माझे कोण ?

आज माझे कोण ?　　माझे नाही कुणी !
जीव साऱ्यांतुनी　　आवरला

शुष्क आज रस्ता　　झाडां जीव नाही
वारा आहे नाही　　भान नसे

वेलींच्या मधून　　वेलीपण गळे
चंद्रातून ढळे　　चंद्रमाच

प्राणावीण सारी　　पोकळी भयाण
जिव्हा शब्दांवीण　　थिजलेली

इथे उरूनिया　　आहे मी गेलेला
पाय रोवलेला　　पलीकडे

उचलीन आता　　दुसरे पाऊल—
त्या आधी तू फूल　　वाहू नको

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा.

## कळून न कळता—

मुळातच संवाद मुळीच नसेल तर मनास त्याचे दुःख मुळीच नाही
असलेला संवाद तुटू लागेल तेव्हा प्राणाची तडफड थांबत नाही
जुळलेल्या नसतील मुळीच तारा तेव्हा सुरांची मनातून अपेक्षाच नाही
रंगलेल्या गाण्यातला सूर ढासळताच तरंगत्या स्वप्नांना आधारच नाही
कळतच नसते कुणास काही तेव्हा कळवण्याचा हट्ट उरतच नाही
कळून न कळता होते कृती तेव्हा पीळ पडल्यावाचून राहात नाही
वादळे होतात जीव दगावतात उध्वस्त होतात कित्येक संसार
दुःख त्यांचे मला कळून सुद्धा आपले मुळापासून कमळ कोमेजत नाही
गळणारी पाने गळणारी मने गळणारी जीवने उदासीन करतात
विसतंतूला पण बसताच हिसका होणाऱ्या वेदनेस अंतच नाही
प्राशिलेले दव अश्रू होऊन येते उगवत्या रक्ताचे होऊ लागते पाणी
मालवत्या ज्योतीचा शेवटचा आवंढा तसा दाटतो प्राण ताणलेल्या मनी
कुणास हाक मारावी ? ओ देणारे सारेही आले तसेतसेच परतून लावलेले
मायेसाठी पाठीवर फिरणारे मऊ हात आपणच कधीतरी तोडून टाकलेले
कुणास हाक मारावी ? भोवतीचे सारे आपणांपुरते तरी मरून पडलेले
अंगास जुळलेल्या फुलांचे मृदू देठ आपणच हातांनी खुडून टाकलेले
कुणास हाक मारावी ? काणाडोळा करून झाडेही बनतात साळसूदपणे निष्ठुर
स्मृतींच्या वावटळी गिरगिरत सोडतात उध्वस्त उरात पेटवीत काहूर
कसे तुझे शब्द पाठ फिरवून बसतात बघतात तिरपे तिरपे हसतात
बुबुळांवर माझ्या उभे राहूनसुद्धा मनापासून कसे दूरच बसतात !
पाण्यात बुडवून हात मूठ दाबून घेताच मुठीत येऊनही निसटते पाणी
जवळ असूनसुद्धा ओघळून जाणाऱ्या त्रयस्थ अर्थास धरावे कुणी ?
राजकन्येस हवे रक्ताचे औषध म्हणून दिला देह कुणी चरकात
बरी झाल्यावर म्हणाली, 'पुढल्या जन्मी तरी खारटपणा नसू द्या तुमच्या रक्तात'
प्राणातून जातात पाजळत्या वेदना असे कसे कुणी जाणीत नाही ?
रंगलेल्या गाण्यातला सूर ढासळताच तरंगत्या स्वप्नांना आधारच नाही !

**थेंब !**

हिरव्या पानावरून निथळे
थेंब टपोरा
काचेरी हळु
लांबत दुसऱ्या
पानावरती
चरण तयाचा
टेकतो न तो
जाइ लकाकुन
किरण रवीचा
भेदुन त्याला
देत लतेला
नाजुक बिल्वर, रंग-मिठीचा

## काजवा

अंधाराच्या मनी फुलती जाणिवा
उजळे काजवा
थेंबाच्या स्पर्शाने चमकते हवा
उजळे काजवा
शहारते पाणी झोंबता गारवा
उजळे काजवा
तिमिरी प्राजक्त स्फुंदत असावा
उजळे काजवा

## कणी-कोंडा

मी माझे दैव सोबतीस घेऊन एकटा बसलो आहे
हे असे तास न् तास वाट पाहाणे पुन्हा नशिबात आले
कसे मन सावध फक्त घुटमळते कानाभवती
भोवतीच्या प्रत्येक नादाची वेचणी करीत
तुझा श्वास अजून त्याला गवसलेला नाही
तुझ्या पावलांचा आवाज आलाच नाही....

दार उघडले....मिटले....शतवार....उघडले
उघडले मन अश्राप आपोआप....प्रत्येक वेळी
केविलवाणी चोच निरागस आ वासून गेली प्रत्येक क्षणी
प्रत्येक क्षणी निराशेवाचून आत कुणी आले नाही
माझ्या रिचवत्या उच्छ्वासावाचून नाद दुसरा उमटलाच नाही

यावीस वाटले की येण्याची गती तुझ्यात मिसळे
बोलावीस वाटले की बोल सगळे तुझ्या गळ्यात होत मोकळे
माझ्या वेदनेचा सूर दूर कुठे तुला कळे
जीवापासून तुटला जीव तुटला तसा पुन्हा जुळे
हेच सारे आज सरे. अर्ध्या जीवात दुःख उरे
अवघ्या मनावरून वारे जाताच देठापासून तुटतात चंद्र-तारे

माहीत होते मला, एकदा असे – असेच घडणार आहे
जीव गेल्यावाचून आग आतबाहेर पेटणार आहे
माहीत होते, शब्द शब्द वाऱ्यावरती विरून जाईल
टर्फलांतून कणीकोंडा धुंडीत वेडे मन राहील
माझा शब्द खरा होता, तोच सले उरात रुतून
—अशा ठायी आयुष्याचे दान गेले कसे चुकून ?

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा.

## यायची तू

यायची तू : उलगडे गती रात्रीतून
चाळवले कार्तिकाचे वारे मनातून
नाजूकशी उरी कळ जशी आहे नाही
हळू घाली अंगातून फुलू दिशा दाही
खेळवीत चांदण्याची चव ओठांवर
तमातून धुमारती जांभुळे केसर
पहाटेची फुलकळी पानांत अजून
पसरिते कांतीतले स्मित दिशांतून
तलावात जल ओले तलम वसन
हळूहळू श्यामलांगी दिसते आतून
यायची तू : फुले मंद कालाचे कमल
माझ्या मनाचाच मला आला परिमल

## वास फुलाचा घेताना

वास फुलाचा घेताना
तुझे व्हायचे स्मरण
मन यायचे भरून

वास फुलाचा घेताना
तूच व्हायचीस फूल
स्पर्श गंधात अबोल

वास फुलाचा घेताना
उरे साक्षी मी केवळ
तूच हुंगतेस फूल

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा.
१०२२०५
काव्य ४५१२

## एक स्वप्न

मी तिला म्हणतो आहे :
'सारे हवे ते या जन्मात
पुन्हा असा जन्म नाही
हा देह पुन्हा नाही
हे मन पुन्हा नाही....'

दोघेही मेलो : ती एक कमळ झाली
आणि मी दवबिंदू होऊन पडलो
जवळच दुसऱ्या पानावर—

मला कमळाला सांगायचे आहे
'मीच तो, मीच तो!'

माझा ऊर आभाळाएवढा ताणून
आकुंचन पावत आहे
पुन्हा ताणला जात आहे
पण मला सांगताच येत नाही
कारण मला बोलता येत नाही

ऊर फुटायला आलाय तरी
मला शब्द फुटत नाही

# अर्थ

सखी ! तुटता तुटता
वेदनेचा अर्थ कळे
पिळा देहाचा पिळता
जीव थेंब थेंब गळे

थेंब गळता, वेदना
सूड त्याच्यात भरते
दुःख तुझ्यामुळे तरी
सारे जग शत्रू होते

सूड ठासलेला थेंब
आता कुठेही रुजेल
दुष्ट मुळ्यांनी कितीक
मूर्ती पहाडी भंगील

सुख सरे : उरे फक्त—
स्फोटास्फोटांची साखळी
माझ्या दाहक नसांची
आता पृथ्वीस वेटोळी !

प्रा. रवीन्द्र किम्बहुने ह्यांच्या वैयक्तिक
ग्रंथसंग्रहातून देणगी स्वरुपात

## परीटदादा

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा.

मी आपला वाचीत पडलेलो असतो काहीतरी गंभीर
गंभीर व्हायलाच हवे आणि विश्व कळायलाच हवे
सहज बाहेर नजर जाते तेव्हा दिसते

—परीटदादा चालला आहे नदीवर
गाढवावर धुण्याचे कपडे घालून
गाढव कसे निमूटपणे चालले आहे
सारा भार घेऊन....

माझा त्याच्याशी तसा संबंध नाही
....जीवात्म्याला शिवाची भेट कशी घडेल हा प्रश्न आहे
जीवात्म्यावरचा अज्ञानाचा थर निघाला पाहिजे
मन स्वच्छ कसे करायचे हा प्रश्न आहे
'चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती'
—तुकोबांनी मर्म सांगितले आहे
हे चित्त शुद्ध कसे होणार? हे कशाने धुवायचे?

....निमूटपणे परीटदादा परत चालला आहे
निमूट गाढव....अमाप भार

विषयांतर करून उपयोग नाही!
....मुख्य म्हणजे भाव हवा
भावानंतर ध्यास हवा
ध्यासापोटी आचार हवा
आचाराला नीतीचे नियंत्रण हवे
यातून आत्मशुद्धि होईल

गीतेत आत्म्याविषयी चांगलेच सांगितले आहे,
'नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः।'
हा आत्मा युगायुगांतून जन्म घेतो
जुने जुने देह टाकून देतो
'वासांसि जीर्णानि यथा विहाय....'
बरोबर हेच! अरे पण—

....परीटदादा पुन्हा नदीवर चालला आहे
गाढव तेच
पण कपड्यांचा ढीग मोठा....

'वासांसि जीर्णानि यथा विहाय....
परीटदादा गेला तरी दिसतोच आहे

विश्वाचे कोडे मी उकलीत असतो
इस्त्रीचे कपडे घालून तेच तेच वाचीत पडतो
....विश्व विराट! विराट म्हणजे किती?
एका फांदीच्या बारीक देठाला सूर्यमालेचा तुरा
आकाशाची अनंत प्रतिबिंबे पहावी एका नजरेत
एवढे मोठे! अबब!
आणि अश्वत्थाच्या एका फांदीवर

....परीटदादा पुन्हा येत आहे
धुतलेल्या कपड्यांचा ढीग घेऊन
फांदीवर वाळत घालण्याकरता

ऊं? हूं! अश्वत्थाच्या एका फांदीवर
ग्रहगोलांची असंख्य वटवाघुळे लोंबणारी
....लोंबणाऱ्या इटुकल्या गावातल्या पिटुकल्या घरात

इवल्याशा खुंटीवर लोंबतो आहे माझा टिचभर गंजीफ्रॉक
मळलेला....घामेजलेला....जाळी झालेला
चाणाक्षपणे धुतलेला....
इतरांच्या कपड्यांत गल्लत होऊ नये म्हणून
काळजी घेतलेली त्याची
त्या गंजीफ्रॉकवर आहेत
तीन केविलवाणी अक्षरे
माझ्या नावाची !

माझे शरीर चपापले आहे
परीटदादा चालला आहे
गाढव तसेच चालले आहे
'गंजीफ्रॉकवरली' तीन अक्षरे
दोघांनीही हेरली आहेत !

## रूळ

आकाशामधि पाचर ठोकुन
पहाड हट्टी उभा निमुळता
दरी सन्निधी, मगर भयंकर
दबे गिळाया डोंगरमाथा

कळप ढगांचा दौडत चाले
लांडग्यांपरी घुमवित हुल्लड
दात विचकते वीज लखाकुन
भेदरुनी मन करिते धडधड

पाउस-धारा घेती कोसळ
देत मुसंडी धावे वारा
तुटून पडता वीज धरेवर
उरी कोसळे खगोल सारा

गडप जाहला गाव दूरवर
भयाण जबडा पृथ्वि-नभाचा
एकलाच मी ! हात पहाडी—
घास उचलितो या देहाचा

सरसरला नयनांतुन पाउस
अनंत हुरहुर मनि खळबळली
गंडस्थल फोडीत गिरीचे
तोच भयंकर शीळ गर्जली

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा.

निसर्ग तुडवित लोहपदांनी
धडधड फुंफत गाडी आली
गिरमिटापरी कडा पोखरित
वळसा घालित निघून गेली

प्रलयकालचा निसर्ग नाचे
गळ्यात माझ्या टाकुन फासा
व्योम दुभंगत वीज कडाडे
दोन रूळ पण देति दिलासा !

## यथा

पायमशिनच्या सुईखालती
पेशी पेशी या जीवाची
चांदण्यातला रेशिमधागा
विणितो चित्रे गतस्मृतींची

तनु जखमांची त्वचा पांघरी
जखमी ठिबके गार चांदणे
त्यातुनिया ते गळे, चाटती—
तळमळणारी पिवळी पाने

चांदण्यावरी दिसे गोंदला
आकाशाचा निळसर ठिपका
विधवा जाणिव अशीच दिसुनी
करुणपणे ती देइ हुंदका

उंच मनोरा—घड्याळ भाळी—
आठ्या घालुन घुमवी ठोका
जाळ्यापरि थरथरे चांदणे
जखमांनाही बसे आचका !

व्यथेस फुटती ओठ दिशांचे
आ वासुन ती रडे उताणी
गळ्यात स्थिरचर तिच्या आडके
विराट रडणे सुरावाचुनी....

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा.

## पापणिच्या काठावर

पापणिच्या काठावर येउन
खळखळणारे
समुद्ररंगी
नयन तुझे हे

जळात बुडत्या रविबिंबासम
बिंबित होउन
थरथरणारे
ओठ तुझे हे

समुद्ररंगी अथांग खेळे तव लालस मन
बघता बघता उरे किनाऱ्याइतुके मीपण !

## ताण

ताण जीवास लागले
आतूनिया उले मन
मिठी नसांची मनाला
सुटे सैलसैलावून

गळ गिळण्याची शक्ती
कधी येणार जिवाला ?
किंवा कधी तुटायाचा
नसामासांचा हा आळा ?

जन्म - मृत्यू या दोहोंत
एक द्यावे, हवे मला
दोन ध्रुव हे ओवाया
नको ताणू रे मजला !

## आज हवेला

आज हवेला गंध सणाचा
गंधाला स्मृति बाळपणाची

प्राजक्तावर पहाट उतरे
गुलबाशीवर सांज विसावे
वृंदावनिच्या सांजवातिशी
कुजबुजताना जाई उमले

त्या संध्येला ओढ अनावर
क्षितिजे पुढची कवळायाची
या पुढच्या क्षितिजाच्या पायी
मिठी सुगंधी बाळपणाची

आज हवेला गंध सणाचा
पोत सुगंधा इंद्रधनूचे

सरसरत्या सोनेरी धारा
विचार फिरवुन मागे फिरती
टोच उरे पण ठायी ठायी
उमटे गोंदण अवतीभवती

उत्कट हिरवेपण तान्हेले
घोट घेतसे गोड उन्हाचा
आनंदाचे मनात वर्तुळ
स्फुरुन व्याप घे क्षितिक्षितिजाचा

## तिळा उघड !

रवि कलता पांगुन कालवतो अंधार
पसरतो खिन्नता पडका पिंपळपार
पाकोळी जाते फडफडुनी क्षणकाल
मनि बालपणाची तिळा उघडिते पाल

तो जुनापुराणा वाडा भव्य विशाल
ती चिंच-कवठिची झाडे शेजारील
अन् सांज त्यातली अंतर कातरणारी
ती तशीच येउन पुढे ठाकती सारी

वळचणीत स्मृतिच्या पुन्हा चुकचुके पाल
भिरभिरून करते घालमेल वाघूळ
समयीत उजळते ज्योती मंद घरात
हो पूर्वरंग अन् बुक्का उधळी रात

म्हातारी आजी निजली माजघरात
गुंतली चुलीशी आई खोल घरात
पण बाबा नाही आले अजुन घरास
मी म्हणे परवचा द्याया धीर मनास

किरकिरते रजनी लिंबोणीच्या मधुनी
चिंचेवर बसला बागुलबोवा लपुनी
बाहेर बघाया धजे न भित्री नजर
व्याकुळल्या ह्रदया कातरते हुरहूर

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा.

गिरणीची धडधड येई मधुनी कानी
लव घंटा नादे दूर देवळामधुनी
कुणि पुराण वाचे जवळ धर्मशाळेत
धारेस्तव कपिला हंबरते गोठ्यात

तो दार वाजते बाहेरील हळूच
मन सशासारखे कापुन लागे काच
हे कोण ? व्याकुळे प्राण, वाजले पाय
पण येती बाबा ! क्षणात फुलते हृदय

मग जेउन निजणे आईला बिलगून
बहिणींस लोटुनी दूर भांडभांडून
चिमण्याशा गमती साठवीत हृदयात
विसरावे चिमणे चिमणे जग दुलईत

ही बालपणाची तिळा उघडते हृदयी
मी मलाच पाहत पाहत मागे जाई
अन् गुंते आतच मंत्र विसरुनी जाता
या सांजेला ती सांज व्यापुनी राही !

## नाव न घेताच

तू येऊन गेल्याचे तो बोलला न
त्याने तुझे नाव असे उच्चारलेच नाही

तरी त्याच्या बेरक्या डोळ्यांत होती छटा
न लपणारी खोल तृप्तीची

जाड आवाजात मिसळलेला होता
एक पाहुणेरा नाजूक कलरव

श्वास घेताना तो धुंगीत होता
त्याच्या घरभर पसरलेला सुगंधी दरवळ

त्याने तुझे नाव न घेताच ठेवला
माझ्या फुलपखी मनावर

—एक इंगळ!

## दोन

निळे सरोवर
त्यावर तरती बदके दोन
जवळ असुन तू त्रयस्थ मानस
सहजच मौन :
हॉटेलातिल मेजावरती
दोन कपबश्या
गिऱ्हाइके नच ओळखणारी
एकामेकांपुढती दोन

## कसे क्षणी भरे मन !

कसे क्षणी भरे मन
क्षणी रिते ओसरून
कशी क्षणापाठीपोटी
भरती नि रितेपण ?

मन भरता, वस्तूंत—
जीव भरे, अर्थ स्फुरे
विश्वा अर्थाचे उधाण
येतायेताच ओसरे

उरे फक्त अवकाश
नाही ऐल नाही पैल
तोल सुटून अस्तित्व
पडे कोसळत खोल

ग्लानि सरे बेशुद्धीची
तेव्हा जाणिवेला कळे
रित्या शून्या जननाचे
पुन्हा लागले डोहाळे

ऐलपैल भरे मन
कसे क्षणी ओघळते
जन्ममृत्यूचे का बीज
मनी कूस बदलते ?

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा.
१०२२०५
काव्य ४५१२

## बेताल मी ! बेबंद मी !

पृथ्वीस या चेंडूपरी लाथाडुनी देईन मी
बेताल मी ! बेबंद मी ! बेहोष मी ! बेफाम मी !

रक्तात या शक्ती असे, शक्तीत या युक्ती वसे
विश्वा, मला याच्यापुढे क्षुद्रा तुझी भीती नसे
काळा ! तुला एकाच रे घासामधे भक्षीन मी
बेताल मी ! बेबंद मी ! बेहोष मी ! बेफाम मी !

स्वर्गातल्या सौदामिनी पंजामधे पिर्गाळुनी
गोठ्यात माझ्या बांधुनी ठेवीन त्यांच्या दावणी
धारा तयांच्या काढुनी प्राशीन त्यांचे तेज मी
बेताल मी! बेबंद मी! बेहोष मी! बेफाम मी!

आता निराशे! ये पुढे; नृत्ये तुझी तू दाखवी
ये तूहि दुर्भाग्या! तुझी कृत्ये बघू दे पाशवी
सूत्रात—खोटया बाहुल्या या—नाचवीतो आज मी!
बेताल मी! बेबंद मी! बेहोष मी! बेफाम मी!

या अप्सरांनो, या पुढे अंगांग शृंगारूनि या
डोळ्यांतुनी चाळ्यांतुनी ओतीत शृंगारास या
रुद्रापरी नेत्रांतल्या अग्नात त्या जाळीन मी
बेताल मी! बेबंद मी! बेहोष मी! बेफाम मी!

केली रतीला आजला मी मस्तकाखाली उशी
गारेप्रमाणे टाकिला मी आज खावोनी शशी
ही भावनांची अस्वले डांबून झालो मुक्त मी
बेताल मी! बेबंद मी! बेहोष मी! बेफाम मी!

मी गुंगलो! मी रंगलो! मी झिंगलो! धुंदावलो
बेछूटतेने हासलो, बेभानतेने नाचलो
—सारे करोनी आजला साऱ्यांतही नाहीच मी!
बेताल मी! बेबंद मी! बेबंद मी! बेबंद मी!

## रंग

हाती धरले फूलपाखरू
फडफड करुनी उडून गेले
स्पर्श-ठसे गेले पंखांवर
अन् बोटांवर रंग राहिले !

## मन

तुला चुंबिता, भिन्न सावल्या
भिंतीवरती गेल्या बिलगुन
चपापलो मी ! कसे उमटले
मनातले मन डोळा चुकवुन

## भेटलीस तू

भेटलीस तू आणि हासलिस
या जीवाला शांत वाटले
अंगावरती हळुच कुणितरी
चमचाभर चांदणे शिंपले !

## ओंजळ

निळसर दरिया, निळसर अंबर
सफेत फेसाची मधि खळबळ
फुले जाइची कुणी हुंगिते
करुन निळ्या हातांची ओंजळ

## श्रावण-संध्या

सोनेरी भुरभूर—बटा या
आवरूनिया पश्चिम बांधी
अंबाडा क्षितिजावर रुळतो
फुले खोविली वर जास्वंदी

## मी पाहिलेली कळी

मी पाहिलेली कळी
माझी होत जाते
नाजूक थरथरीत उमलू लागताना

मी पाहिलेले फूल
माझे होत असते
फांदीवरून खाली पडत असताना

## हायड्रोजन बॉंब

विज्ञानाच्या भुवया लोचनी
क्ष-किरणांची नजर नाचली
मानवतेच्या गळ्याभोवती
नश्वरतेची तात काचली

पायाखालिल मातीमधली
अणुरेणूंची गुपिते फसली
कणाकणांच्या अवकाशातुन
बकासुराची सेना हसली

भयाण शक्ती कडाडूनिया
हिरोशिमावर तुटून पडल्या
मानवतेच्या संसाराच्या
राई राई ठिकऱ्या उडल्या

पृथ्वीच्या पोटात सरकला
अणुगोलाचा अजस्त्र गोळा
विश्वशांतिचा गर्भ गळाला
झाले जीवन क्षण-पाचोळा

अर्ध्या संसारी जळलेल्या
नागासाकीतिल आसक्ती
छाया होऊन कापत फिरल्या
पाहत आयुष्याची माती

त्याच सावल्या पुन्हा दचकल्या
किंचाळुनिया मूर्च्छित पडल्या
नवअस्त्राच्या ज्वाळा जेव्हा
टाळु नभाची चाटुन आल्या

हिमालयाचा विक्रम लंघुन
आग धडाडुन भडकुन उठली
प्रचंड झोताखाली पृथ्वी
जणु दिवटीची वाटी ठरली

त्या विध्वंसक ज्वालांवरती
फुलासारखा सूर्य करपला
चक्र तोडुनी क्षणात पुढती
हजार वर्षे काळ उधळला

धसका घेऊन हृदय तडफडे —
विजयोन्मादे कसे हसावे ?
वाढवायचे ज्या हातांनी
गळ्यास नख का त्यांनी द्यावे ?

ईर्ष्या-जिगिषांच्या तिरडीवर
माझी मानवता न मरावी !
ठरो न हे विज्ञान कावळा
माझी पृथ्वी पिंड न व्हावी !

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा.

## पक्षी

मी पाहिला आहे एक खंड्या पक्षी
        एकलव्य नजरेने लक्ष्यावर खिळून
        अधांतरी एकठाय भुरभुरत राहाणारा
        मनमोकळ्या धारेतल्या अचपळ मत्स्याचा
        बिंबासकट लीलात्म वेध घेणारा
एक खंड्या पक्षी
        चिवचिवत्या शब्दांना माया लावणारा

मी पाहिला आहे एक पारवा पक्षी
        चोचीतच विरणारे रंग-संग वेचीत
        मन्मथी वादळांत हताश भ्रमणारा
        अंगाशी भिडूनही ओघळते आभाळ
        पिसांवरती त्याला झेद्ध बघणारा
एक पारवा पक्षी
        गतीला-गीतीला साद घालणारा !

## स्पंदन

थंडीत शहारुन विरली मूक दुपार
रवि कलंडला चुळबुळत्या राईपार
घर अंधारुन ये, भिंतीवरती उमटे
छायांकित स्पंदन किरणांचे अनिवार

हलताती छाया--क्षीण किरण तळमळती
सोनेरी कुंतल सैल सोडुनी झुरती
बिलगती परस्पर, क्षणी विलग होताना
तुटतात कोवळ्या नसा, कोवळी नाती

जिवण्यांतुन इवल्या भरे करुण काहूर
राहतात शब्दांविना धपापत ऊर
होतात विलग ते ओठ, ताणले जाती
मिटतात उघडती परी न फुटतो सूर

अंधार दाटता बसुन आचके देही
भिंतीतच हळवे स्पंदन हरपुन जाई
आकार जगाचा पुसे, नि तिमिरामधुनी
राईची सळसळ सलत खोलवर राही !

## आधार !

अंधारात काहीतरी वाजले तेव्हा
किती घाबरलीस तू
माझा हात धरून म्हणालीस,
'मला भीती वाटते—तू असा जवळ राहा'
'कसली भीती? मी आहे ना जवळ?'
तुला सांगता आले नाही
तुझे अंग थरथरत राहिले
खिडकीतून तू नुसतीच पाहात राहिलीस, व्याकुळ—
प्रथमच जाणवले :
चंद्र एकटाच फिरत असतो भयाण पोकळीत....

राणी, तू आता शांत झोपलेली आहेस
माझ्या आधारावर
निवांत विसावलेले वदन, अश्राप, सुखी
केवढा आधार वाटतो आहे तुला या पृथ्वीचा
आणि माझ्या अस्तित्वाचा !
दारावरून एक निःशब्द अंत्ययात्रा चालली आहे
बत्त्यांच्या प्रकाशात
—माझा पहारा भाबडा आहे

....मी पाहात होतो एक अरण्य
सागाची उंचसोट निष्पर्ण पांढरी झाडे
निःशब्द श्वासरहित वातावरण
आणि तू एकटीच चालली होतीस
ओढल्यासारखी

दऱ्याखोऱ्यांतून एकटी, भांबावलेली, कावरीबावरी
'राणी थांब, राणी थांब....'
तुला ऐकूच न येणारी माझी मैलोमैल लांब हाक....
दचकून मी जागा झालो
अंग सर्द
अंगावर हात फिरवीत तू म्हणत होतीस
'घाबरू नको ना असा! मी आहे ना जवळ!'

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा.

## कितीक वर्षे....

कितीक वर्षे आली—गेली
पिसेच काळाची फडफडली
आग वयाची उसवित जळता
सिगारेटहुन राख वाढली!

धोक्याच्या पाटीवर धावे
दप्तर घेउन शिशु चित्रातिल
भास गतीचा अखंड, भ्रामक;
दिसे धावते तरीहि निश्चल

टिचक्या देते घड्याळ खवचट
हा काळाचा क्रमी त्रिषारी;
पचांगांवर जीवन कापित
दिवस-रात्रिची फिरे कातरी

वाटत होते घडुनी यावे
निश्चलता फोडून निघावे
    अमर्याद ओढीने साऱ्या
        विश्वाला शोधित जाणाऱ्या
            रॉकेटासम जीवन जावे....

अग्निबाण हा परी पसरला
खंगत पडक्या पुलासारखा
टिचक्या देते घड्याळ खवचट
—केस पांढरे, उरात परका

कितीक वर्षे आली....गेली
कितीक जातिल, हासुन वदतिल :
‘—या कवितेच्या स्तंभावरती
दप्तर घेउन शिशु चित्रातिल !’

## वाट पाहता पाहता –

वाट पाहता पाहता
वाटा नसाच जाहल्या
प्राण वाटांनी खेचता
तुटेजाइतो ताणला

दृष्टी कणकण केली
आसमंती अंथरली
नेत्री शिणल्या दिशांनी
रिती पोकळी ओतली

मृत्यू येतो तरीसुद्धा
असे भुके मन मन
कण करून स्वतःचे
विश्वी धुंडिते पांगून

मन वेचल्यावीण ते
नवा जन्म साध्य नाही
जन्म लाभल्यावाचून
भेटीचाही योग नाही

म्हणून ते वेचण्याचा
असा अट्टाहास केला
नाळ वाटांचा तोडून
जन्म भेटाया घेतला

किती आक्रंदावे आता
दिशा डोळ्यांत धरून

कशी अजूनही तुझी
नाही चाहूल ना खूण

वाट पाहता पाहता
पुन्हा जन्म हा ओसरे
वाट पाहता, शिणले —
पुन्हा मागे मन उरे

प्रा. रवीन्द्र किम्बहुने ह्यांच्या वैयक्तिक
ग्रंथसंग्रहातून देणगी स्वरुपात

## डाव

तू मला म्हणालीस, 'असा दुपारी ये वाट बघेन
आणि मी दुपार टळल्यावर उभा तुझ्या दारात—उशीरा
वाटले तू रागावून रुसून बसली असशील
बराच वेळ दार उघडणारही नाहीस! पण
दार उघडेच....

पुढ्यात अनेक जुन्या वस्तूंचा डाव मांडून तू जशी रमली होतीस!
आनंद दाखवीत मला म्हणालीस, 'ये कसा—
कसा 'वेळेवर' आलास!
हा बघ गजरा, तू दिलेला वर्षापूर्वी
—त्या सुकलेल्या फुलांचा ऊर भरून वास तू घेतेस
या बघ तुला रस्त्यात सापडलेल्या गुंजा
माझ्यासाठी तू आणल्यास नि म्हणालास—
"तुझ्या गालाच्या खळीत ठेवण्यासाठी!"—हसतेस
—आणि ही काचेची हिरवी गोटी!
असेच दिसले ना माझे डोळे तुला?—रोखून बघतेस
हे बघ तुझे पत्र—जागून लिहिलेले....'

—तू ते पत्र छातीशी धरतेस, हरवून जातेस,
त्यांतच मला म्हणतेस—
'या गुंजांशेजारी, या गजऱ्याशेजारी, या पत्राशेजारी
तूही असा सरकून बस ना जरा
म्हणजे डाव कसा पुरा होईल!'

## बोहारीण

आली बोहारीण दारी वस्त्रे मागाया लागली
जुनी अंगडी-टोपडी तिच्या पाटीत घातली

आली बोहारीण दारी 'नवे काही द्या' म्हणाली
वस्त्रे शोभेची उबेची तिने बळे बळे नेली

आली बोहारीण, तिची वाट नित्याचीच झाली
'दादा अंगावर नेसू तसे काही द्या' म्हणाली

बोहारिणी, तुला दिले सारे, तूही नेले सारे
तुवा दिलेली काचेची भांडी फुटूफुटू गेली

आता घरामधी चिंध्या सारी लोंबली लक्तरे
भांड्यांच्या त्या काचाकाचा खाली केर केर उरे

का ग बोहारिणी, आता फेरी तुवा चुकविली
कोण टाकील उरले तुझ्यावीण गंगाजली ?

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा.

## निदान

गळ्यात अडल्या अर्ध्या ताना
सूर न फुटले पुढे मनाला
क्षितिजापाशी नजर गळाली
ज्ञान उभाळे अर्धागोळा

किती उभविले !—फक्त उबविले
उरती फोले मनि इच्छांची
कर्तृत्वाशी अक्षर–ओळख
मनी वसाहत दाट भयाची

उरात दाटे हाक : तमिस्रा :
अश्रूतच बुबुळे मावळली
पिळवटुनी अंधार जिण्याचा
निदान फुटु दे बोंब आगळी

## कवितेसाठी

या तेजोमय गर्भातून निघून
हे असंख्य जाणिवांचे उजळते खंड
भ्रमत राहातात अवकाशात
पिसाटपणाने

फुटलेल्या मडक्याच्या या उडत्या तबकड्या
सुटलेल्या माझ्या नियंत्रणातून केव्हाच
त्यांना जोडू बघणारे माझे मन
फिरते आहे फरफटत सुसाट
सोनसाखळीस लोंबणाऱ्या
अंतराळवीराप्रमाणे

भ्रमणाऱ्या माझ्या ग्रहताऱ्यांनो, या!
कोसळा होऊन उल्का या तेजोगर्भात
माझा घटाकार पूर्ण करण्यासाठी,
या कवितेसाठी

जिचे शब्द आपोआप पहाटलेले राहातील!

१०२२०५
काव्य ४५१रा

## कधी उमलले क्षण हे

कधी उमलले क्षण हे अपुले
अता पाकळ्या मिटून बसले
तरल मनोगत पोचविणारे
दुवे सुगंधी गळून पडले

कसे घेतले मीच मला गे
तुझिया देठामधून तोडुन !
मुके मुके क्षण गळत चालले
सुकू लागता तुटके जीवन

निर्माल्यामधि जीव पांगळा
आक्रसलेल्या दिशांत अडला
दूर पोचणाऱ्या हाकेचा
पाय गळ्यातच गुंतुन पडला

कबरीतूनहि फुटते वाचा
फाटे प्रश्नांवर पण तीही :
'देठाशी कधि जुळती सुमने ?
फुलतिल का ती जुळली तरिही—?'

## तेव्हा

धरीत होतो त्याला तेव्हा नव्हतो मी माझ्यात
पृथ्वीवरती वारा तैसा माझा जीव तयात
देह मातिचा तिथेच होता, नव्हते हे ठाउक
जाणिव होती खेळत त्याशी, त्या वातावरणात
स्पर्श जाहला कसला धरले कुणी जरा रोधून
तुटे साखळी, विरे झळाळी, अद्भुत येइ उरात
अरे, देह हा करीत होता अभिनय तोच तसाच
आणि कुठे मग मी तर होतो ? माझे मज अज्ञात

## लेखनकाल

| | | | |
|---|---|---|---|
| अभिषेक | ६-८-६८ | नावाडी | १८-९-६२ |
| तू : वेळा : | १-१०-६३ | ऊन ! | १८-१२-६० |
| तोल | ७-१०-६७ | तुझे प्रेम पाहूनिया | १२-१२-६१ |
| बादली | १०-३-६३ | अशी | २६-१-६३ |
| श्रावणसरी | १९-८-५२ | तुझ्या प्रीतीने कळले ! | २९-११-६१ |
| एक भयाचे नगर | १६-११-६५ | धागा | २०-१-६२ |
| काही सुचत असते... | १-१०-६७ | आज डोळां पाणी | १-१०-६२ |
| कुहू...कुहू | १७-११-६५ | पान | १-१०-६२ |
| खिडकी | १-२-६६ | आज माझे कोण ? | १९६३ |
| एक खाष्ट म्हातारा | ३१-३-६४ | कळून न कळता— | १३-२-६४ |
| ती न्हाते ! | २-१०-५९ | थेंब ! | १९५६ |
| भय | १०-१२-६० | काजवा | ६-८-५८ |
| एक अनुभव...स्वप्नातला ! | १८-६-६६ | कणी-कोंडा | १९६३ |
| हात हालतोच आहे तर | जाने. ६९ | यायची तू | २-१०-६७ |
| पदर जळाला... | १७-२-५६ | वास फुलाचा घेताना | २२-१०-६७ |
| विस्तवापरीस होतो धुमसून | १२-२-६३ | एक स्वप्न | १०-१-६६ |

प्रा. रवीन्द्र किम्बहुने ह्यांच्या वैयक्तिक
ग्रंथसंग्रहातून देणगी स्वरुपात

पृष्ठ ५४ वरील कवितेचे शीर्षक 'व्यथा' असे वाचावे.
पृष्ठ ५६ 'ताण' कवितेतील चौथी ओळ 'सुटे सैलसैलावून' अशी आणि
पृष्ठ ६० 'नाव न घेताच' कवितेतील पहिली ओळ 'तू येऊन गेल्याचे तो बोलला नाही' अशी वाचावी.

सार्वजनिक वाचनालय, कल्याण
रामबाग शाखा.

| | | | |
|---|---|---|---|
| अर्थ | २५-४-६१ | ओंजळ | १९५१ |
| परीटदादा | १-१०-६२ | श्रावणसंध्या | २५-८-५८ |
| रूळ | २४-८-५१ | मी पाहिलेली कळी | ८-१०-६९ |
| व्यथा | २४-१२-५६ | हायड्रोजन बॉंब | १९-११-५२ |
| पापणिच्या काठावर | ३०-३-६४ | पक्षी | २३-९-६७ |
| ताण | २५-४-६१ | स्पंदन | २२-१२-५२ |
| आज हवेला | २५-८-५८ | आधार! | १०-१-६९ |
| तिळा उघड! | २६-८-५१ | कितीक वर्षे... | ४-१०-५१ |
| नाव न घेताच | ३१-७-६८ | वाट पाहता पाहता— | १६-१-६२ |
| दोन | २३-९-६७ | डाव | ३-१०-६७ |
| कसे क्षणी भरे मन! | ८-९-६२ | बोहारीण | ४-१०-६२ |
| बेताल मी! बेबंद मी! | ३-९-५० | निदान | १६-११-६५ |
| रंग | ५-९-६० | कवितेसाठी | ३०-१०-६८ |
| मन | ५-२-६३ | कधी उमलले क्षण हे | २७-५-६४ |
| भेटलीस तू | १९५८ | तेव्हा | १८-१-५४ |



पुस्तकाची पाने फाडू/दुमडू नयेत.
पुस्तक जपून वापरावे



कविता, कथा आणि काव्यसमीक्षा या तीनही प्रकारचे लेखन श्री. शंकर वैद्य गेली अनेक वर्षे सातत्याने करीत आहेत. त्यातही काव्य हा त्यांचा अधिक जिव्हाळ्याचा विषय-जीवनातील विविध स्वरूपाच्या अनुभवाशी श्री. वैद्य यांचे मन समरसलेले आहे. तरी त्यांच्या कालानुभूती आणि प्रेमानुभव ही त्यांच्या कवितेचे वेगळेपण निर्माण करणारी वैशिष्ट्ये होत.

गतीतून अखंड उलगडत जाणारा काळ आणि काळ—एक अटळ विनाशशक्ती या दोन्ही दृष्टींनी काळाचा अनुभव कविमनाला असंख्य वेगवेगळ्या रूपांत जाणवताना दिसतो. या काळाला त्याची कडू—गोड चव आहे. कालाचे कमल उमलते आणि त्यातूनच उमललेल्या कविमनाचा परिमल दरवळू लागतो. धरण फुटून काळाचा सर्वसंचारी लोट कल्लोळत येतो आणि जन्माचा एकेक थर धुवून नेतो. कवीची सखी कालवस्त्रातच लपेटलेली असते व तिचे गूढ रूप उलगडणाऱ्या काळातून नित्यनव्या अविष्कारात अनुभवास येते. कधी नीरव मध्यरात्री अचानक ‘होश्यार’ अशी काळाची बांग ऐकू येते तर केव्हा एखाद्या माळ्यावर पहुडलेले त्याचे भयद रूप दिसत राहाते. हे संमिश्र अनुभव एरव्हीच्या जीवनात डोळ्यांआड झालेली पण वस्तुतः दृढ व शाश्वत असलेली अनेक नाती आपल्या मनात जागी करतात, त्या नात्यांची खेच अनुभवायला लावतात व त्यातूनच जीवनाच्या खोल व विराट स्वरूपाला आणि त्याच्या गाभ्यातल्या चिरंतन सत्याला स्पर्श करतात.

प्रेम-प्रणयाचे अनुभवही विलक्षण जिव्हाळ्यानें व गंभीरपणाने या कवितेत आलेले आहेत. कौतुक, वात्सल्य, भक्ती अशा छटांनी ते विकसित झालेले आहेत. या प्रेमाला मानसिक संवादाचे अधिष्ठान आहे. कधी या हृदयसंवादात अंतराय निर्माण होऊन प्राण कासावीस होतात तर कधी हृदयसंवाद असूनही काळाचे विलसित उमगल्यामुळे प्रेमिकांनी परस्परांना दिलेल्या आधारातले भाबडेपण जाणवत राहाते. श्री. वैद्यांची कालविषयक जाणीव अशी त्यांच्या प्रेमानुभवांनाही व्यापून राहाते.

अशा अनेकविध अनुभवांचा आविष्कार होताना अनुरूप प्रतिमा, मांडणीचे नवनवे प्रयोग व ‘स्व’—तंत्र छंद वेऊन ‘कालस्वर’ सिद्ध झालेला दिसतो.

**किंमत तीन रुपये**